# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम,२००७

## विद्युत अधिनियम २००३

क्रमांक-मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/बेस्ट उपक्रम/६३० विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (डी) सह कलम १६ चे परंतुक आणि कलम १७२ च्या खंड (बी) ने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालील विनियम करीत आहे:-

**१. संक्षिप्त नांव, लागू करणे, व्याप्ती व प्रारंभ**

(१) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २००७" असे म्हणावे.

(२) हे विनियम, विद्युत अधिनियम, २००३ ने रद्द केलेल्या कायद्यांखाली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना पूर्वी देण्यात आलेला परवाना, मंजू-या किंवा मान्यता यांना अधिक्रमित करतील.

(३) हे विनियम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या संपूर्ण वीज पुरवठ्याच्या क्षेत्राला लागू असतील.

(४) हे विनियम, शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या:**

या विनियमात, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर:-

(अ) "अधिनियम" म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेला विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(ब) "बेस्ट" किंवा "वितरण परवानाधारक" म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिकेचा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम;

(क) "सर्वसाधारण अटी" म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी.

या विनियमात वापरलेल्या आणि ज्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द व उक्तींना अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियम आणि विनियमांत असलेला अर्थ राहील.

## ३. अर्थनिश्चिती

बेस्टच्या बाबतीतील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केल्याप्रमाणे परवान्याच्या सर्वसाधारण अटी, या बेस्टच्या परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि या अटी येथे खाली विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रातील त्यांच्या विजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

## ४. पुरवठ्याचे क्षेत्र

४.१ वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करावयाचे क्षेत्र हे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २२ जुलै, १९९४ च्या राजपत्रातील अधिसूचने द्वारे दुरुस्त केलेल्या "दि बॉम्बे इलेक्ट्रिक लायसन्स, १९०५" दिनांक ६ जून १९०५ खाली प्राधिकृत केल्याप्रमाणे असेल, आणि ते पुरवठ्याच्या क्षेत्राच्या नकाशात (लाल रंगात) अधिक तपशिलासह दाखविलेले असेल आणि ते वितरण परवानाधारकाने आयोगाकडे सादर केलेले असेल. त्यानुसार, पुरवठ्याच्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे आहेः-

> मुंबई शहर, नगर आणि बेट हे क्षेत्र, परंतु प्रत्येक लष्करी छावणी क्षेत्र, संरक्षित ठिकाण, दारुगोळा, कारखाना, डॉकयार्ड, व कॅम्प आणि नौदल किंवा लष्करी प्रयोजनासाठी शासनाच्या ताब्यात असलेली प्रत्येक इमारत किंवा जागा, जी पुर्णतः किंवा काही प्रमाणात या क्षेत्रात स्थित असेल, यांचा या क्षेत्रात समावेश नसेल.

४.२ अधिनियमातील तरतुदींनुसार सर्व प्रयोजनांसाठी जनतेला वीज पुरवठा करण्यास वितरण परवानाधारक प्राधिकृत राहील.

## ५. परवान्याची मुदत

वितरण परवानाधारक, दिनांक १० जून, २००३ पासून, (म्हणजेच ज्या दिवशी विद्युत अधिनियम, २००३ अंमलात आला त्या दिनांकापासून) पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता परवानाधारक असल्याचे मानण्यात येईल.

## ६. विशिष्ट अटी व परवान्याची पाहणी

या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर लगेच, वितरण परवानाधारक त्याच्या विशिष्ट अटी व परवाना, मंजू-या किंवा मान्यता जनतेला पाहणीकरिता उपलब्ध करुन देईल.

## ७. दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोगाला कोणत्याही वेळी, या विनियमातील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेर-फार, अल्प-बदल किंवा दुरुस्ती करता येतील. या विनियमात केलेले कोणतेही बदल त्यासंबधीच्या

अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू राहतील आणि ते बदल त्यानंतर त्यांच्या बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहतील किंवा राहणार नाहीत, जसे असेल तसे. तथापि, हे बदल अंमलात आणत असताना, या पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेला, अशा बदलामुळे किंवा रद्दीकरणामुळे, बाधा येणार नाही.

## ८. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील तरतूदींची अंमलजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, अधिनियमातील तरतूदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतूदी करता येतील.

सही/-
(मालिनी शंकर)
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

ठिकाण:- मुंबई

दिनांक:- २ एप्रिल, २००७

पुरवठ्याचे क्षेत्र दर्शविणारे नकाशे
( विनियम ४ च्या संदर्भात)

